**<u>सं. फौ. ख. क्र. २६/२०२५</u>**
**<u>निशाणी क्र. ३५</u>**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. ३</u>:**
कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव :– एजाज हमीद शेख
वय :– ५२ वर्षे,
धंदा :– व्यापार
राहणार :– नानापेठ पुणे.

**<u>फिर्यादीतर्फे वकील श्री. शिवाजीराव पाटील यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०१. दिनांक २८/१२/२०२४ रोजी मला श्री. बालवडकर यांनी मनुषा मस्जीद ट्रस्ट कब्रस्थान नानापेठ पुणे येथे पंचनामा करतेवेळी बोलावले होते. त्या ठिकाणी वृक्षतोड करण्यात आलेली होती त्यामुळे घटनास्थळाचा पंचनामा त्या ठिकाणी करायचा होता. सुमारे ७ ते ८ वृक्ष तोडण्यात आलेले होते. पंचनामा हा दुपारी ३ ते ४ च्या सुमारास करण्यात आला होता. आता मला पंचनामा निशाणी १८ दाखवण्यात आला. त्यावर पंच म्हणुन माझी सही आहे तसेच त्यावर इकबाल कासम यांची देखील पंच म्हणून सही आहे. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत. सदर वृक्षतोडीबाबत मी ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे देखील फोटोसह तक्रार दिली होती. सदरचे फोटो मी माझ्या मोबाईलमध्ये काढले होते व त्याची कलर प्रींट काढून घेतली होती. सदर प्रींट काढलेबाबत मी पावती सादर करू शकतो. आरोपीविरुद्धचे कागदपत्र मी फिर्यादी यांचेकडे दिले होते. त्यांनी सदर कागदपत्र प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल केलेले आहेत. **सरतपास पुर्ण...**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आर. एस. पोटे यांच्यामार्फत सुरु</u> :–**

०२. हे म्हणणे बरोबर आहे की, पंचनाम्यामध्ये माझा पत्ता ४७२, नानापेठ मनुषा मस्जीद जवळ असा दिलेला आहे. सदरचा पत्ता हा घटना ठिकाणाहून सुमारे १०० मिटर अंतरावर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर पत्त्यावरुन घटनास्थळ दिसत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी जो पत्ता दिला आहे त्यामध्ये व घटनास्थळामध्ये दोन इमारती आहेत. मस्जीद कडे जाताना डाव्या बाजुला एस. एस.

की मेकर हे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना ठिकाणाच्या जवळ मॉडर्न नावाची इमारत आहे. पंचनाम्यामध्ये नमूद असलेले वृक्ष बुच या जातीचे होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष फिर्यादी यांनी वृक्षतोडीसाठी वापरलेले कोणतेही साधन जप्त केलेले नाही तसेच लाकुडफाटा देखील जप्त केला नव्हता. निशाणी १७ वरील तक्रारी अर्जावर मागील पानावर माझी देखील सही आहे. तसेच त्यावर सही करणारे इतर दोन तीन लोक हे कोंडवा येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १७ वरील तक्रारी अर्जासोबत परवानगी दिलेबाबत पत्र देखील जोडलेले होते. मनुषा मस्जीद ट्रस्ट मध्ये मी देखील ट्रस्टी आहे. हे म्हणणे खरे नाही की, इकबाल कासम शेख यांचे सांगणेवरून मी सदर तक्रारी अर्जावर सही केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, श्री. बालवडकर यांनी पंचनामा तयार करून ठेवला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

| | समक्ष, | श्रवणोत्तर स्वीकृत, |
|---|---|---|
| | **सही/-** | **सही/-** |
| ठिकाणः पुणे | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** | **(श्रीमती एन. एस. सय्यद)** |
| दिनांकः ०५/०२/२०२६. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>(मनपा न्यायालय), जि. पुणे. | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>(मनपा न्यायालय), जि. पुणे. |